# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०४/२०२४ (गुरूवार) सकाळ**

---

**आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद**

पोस्टे देवलापारः— अंतर्गत मौजा रमजान घोटी फिर्यादीचे राहते घरी दिनांक ०४/०४/२०२४ ते १२.०० वा. ते १२.३० वा. दरम्यान यातील मृतक महिला व **आरोपी नामे— लोकेश मारबते, रा. धारगाव जि. भंडारा ह. मु. मोझरी जि. भंडारा** यांचे अंदाजे ०१ वर्षापासून प्रेमसंबंध असुन आरोपीने मृतक हिचे सोबत राहुन पत्नी प्रमाणे व्यवहार केला. आणि लग्नास नकार देवुन दुसऱ्या मुलीसोबत लग्न जुळविले. त्यामुळे मृतक ही दुखावल्या गेली तिला धक्का बसला याच कारणावरून गाव रमजान घोटी येथे तिने आपल्या घरी कोणाला काहीही न सांगता निराश होवुन कोणतेतरी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. तिच्या आत्महत्येस व मरणास आरोपी हा कारणीभूत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे देवलापार येथे आरोपीविरूद्ध कलम ३०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि राजेश पाटील हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर